**Research Papers**

# मराठी ग्रामीण कथा : स्वरुप आणि वाटचाल

**प्रा.ओहळ अभिमन्यू गेना**

**छत्रपती शिवाजी कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय, सोलापूर.**

**प्रास्ताविक :-**

ग्रामीण साहित्य हा आधूनिक मराठी साहित्यातील महत्वाचा प्रवाह आहे. मराठी साहित्यातील मध्यवर्ती मुख्य प्रवाह हा उच्चवर्णीय व पांढरपेशा वर्गापुरताच मर्यादित होता. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून व्यक्त होणा-या जाणीवांना खूप मर्यादा होत्या. त्याच प्रमाणे त्यांच्या अनुभवलाही मर्यादा होत्या. त्यामुळे हे साहित्य ख-या अर्थाने सर्व समाजाचे प्रतिनिधीत्व करीत नव्हते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाला. ग्रामीण भागातील समाज उच्च शिक्षण घेऊ लागला. विविध प्रकारचे साहित्य वाचू लागला. परंतु या साहित्यातून त्यांना आपला गांव, आपली माणसे आपली माती,आपले शिवार या सा-यांचे दर्शन होताना दिसत नव्हते. ऐंशी टक्के लोक ग्रामीण भागात राहतात, तरीही त्यांच्या जीवनाचे दर्शन या साहित्यामध्ये होत नाही याची जाणीव या सुशिक्षित झालेल्या ग्रामीण भागातील पिढीला झाली. यामुळेच १९६० नंतर ग्रामीण भागातील या पिढीने ग्रामीण जाणीवा, वास्तव आपल्या साहित्यातून मांडण्यास सुरुवात केली.

**ग्रामीण साहित्य :-**

मराठी साहित्याच्या समृध्दीमध्ये ग्रामीण साहित्याने भर टाकली आहे. तरीही ग्रामीण साहित्य म्हणजे काय ? याबद्दल अनेक विचारवंतानी विविध मतमतांतरे व्यक्त केली आहेत. आनंद यादव यांच्या " ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या " या ग्रंथाच्या प्रस्तावनेत प्रा. गो.म. कुलकर्णी म्हणतात, "ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीणांनी लिहिलेले ? की हे सर्व ? हा आणखी एक प्रश्न. खेडेगावातील जीवनपध्दती, तेथील रीतीरिवाज, शेती,निर्सग,मातीशी एकरुप झालेले मानवी मन, प्रदेशानिष्ठा एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये, मानवी जीवनाला त्याच प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक सामाजिक, धार्मिक ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न आणि समस्या या सा-याचा त्यांनी ग्रामीण या कक्षेत समावेश केला आहे. " डॉ. नागनाथ कोतापल्ले " ग्रामीण साहित्य : सवरुप व शोध " या आपल्या ग्रंथात म्हणतात. " ग्रामीण जीवनातून, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य असे म्हणता येईल." तर डॉ.श्रीराम गुंदेकर आपल्या " ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन " या ग्रंथात म्हणतात. कृषिनिष्ठ जाणिवांचा,ग्रामीण जाणिवांचा कलात्मक, उत्कट सहज अविष्कार म्हणजे ग्रामीण साहित्य होय. "

ग्रामीण साहित्याच्या विविध व्याख्या ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांनी केल्या आहेत. परंतु परिपूर्ण व सर्व समावेशक अशी वयाख्या करता आलेली नाही. यावरुन असे सांगता येईल की, ग्रामीण साहित्य हे प्रामुख्याने शेती शेतीला पूरक म्हणून चालणा-या उद्योगावर उपजिवीका करणा-या लोकांचे साहित्य आहे.

**ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा :**

ग्रामीण साहित्याची प्रेरणा शोधताना महात्मा फुले यांच्या साहित्यापर्यत जाता येते. इंग्रजी राजवटीत एकूण समाज जीवनात मोठया प्रमाणात बदल झाले. औद्योगीकीकरण झाले. याचा परिणाम कृषी जीवनावर झाला. शेतसारा वाढीमुळे ग्रामीण जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले. ग्रामीण जीवन होरपळून निघाले या सगळयांच्या प्रतिक्रिया म्हणून रोखठोकपण महात्मा फुले यांच्या साहित्यात उमटल्या. म. फुले यांचे लेख म्हणजे ग्रामीण साहित्याचा पहिला सशक्त अविष्कार होय." गुलामगिरी " शेतक-यांचा आसुड,याग्रंथात त्यांनी शेतक-या संबंधी मुलगामी विचार मांडले. शेतक-यांचा आसुड. मध्ये शेतक-यांचे सर्व बाजूनी होणारे शोषण, त्यांचे दारिद्रय आणि दयनीय अवस्था त्यांनी फार परिणामकारकपणे रेखाटली आहे. शेतक-यासबंधीची ,शेतीसंबंधीची

आणि ग्रामीण जीवनाला प्राप्त झालेल्या दुरावस्थेची संबंधीची जाणीव प्रथमतः मराठीमध्ये म. फुले यांनी प्रकट केली. " गुलामगिरी " या ग्रंथातूनही त्यांनी शेतक-यांच्या दारिद्रयाचे चित्र रेखाटले आहे. " काय पूरती लंगोटी, फिरती नांगराचे पाती " हे शेतक-यांच्या वास्तव जीवनाचे चित्रण त्यांनी मांडले आहे . म.फुले यांनी प्रारंभी लिहिलेल्या "तृतीयरत्न" या नाटकामधून शेतक-यांचे धर्माच्या माध्यमातून कसे शोषण होते याचे चित्रण केले आहे.

यानंतर कृष्णराव भालेकर यांनीही शेतीजीवनावर आधारित काव्यलेखन केलेले आढळते. भालेकर हे महात्मा फुले यांच्या अनुयांयापैकी एक होते. शेतक-यांचे मधूर गायन, रधूगाडीवानाचा पोवाडा या कविता शेतक-यांच्या जीवनावर आधारित आहेत. त्यांनी रघूगाडीवानाचा पोवाडा यामधून सरकारच्या अंधाधुंद कारभारावर फटके ओढले आहेत. १९८८ मध्ये " दिनमित्र " यादिवाळी अंकात " बळीचा पाटील " नावाची कादंबरी क्रमश : प्रसिध्द झाली. दुष्काळातही स्वतःच्या स्वार्थासाठी कष्टकरी शेतक-यांचे शासकिय आधिका-याकडून व गावकामगाराकडून कसे शोषण होते हे प्रभावीपणे रेखाटले आहे. या शिवाय मुकूंदराव पाटील आणि वि.रा. शिंदे यांचे ललित व वैचारिक स्वरुपाचे साहित्य ग्रामीण साहित्याचा भरभक्कम पायाच आहे.

१९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला आणि म.गांधीचा उदय झाला. खेडयाकडे चला ही म.गांधीनी घोषणा दिली. त्यांच्या संदेशानुसार ग्रामीण परिसर तरुण मनाला आव्हानात्मक वाटला. गांधीवादाने ग्रामोध्दार या कल्पनेला महत्व दिले. ग्रामसुधारणा करण्याच्या हेतूने अनेक तरुण, ध्येवादी व त्यागी माणसे खेडयासाठी काम करु लागली. याचा परिणाम साहित्यावर झाला आणि त्यातूनच या ग्रामोध्दाराचे चित्रण कथा - कादंब-यातून होऊ लागले.

**मराठी ग्रामीण कथेची वाटचाल**

ग्रामीण कथेचा कलेच्यादृष्टीने वेगळा असा प्रकार नाही. इतर कथा प्रमाणे ती एक कथा आहे. ग्रामीण हे तिचे विशेषण आहे. ग्रामीण जीवनाची अनुभूती ग्रामीण कथेतून व्यक्त होते. खेडेगांव तेथि्ल जीवनपध्दती, रुढी, परंपरा, शेती, तेथील निसर्ग, काळया मातीशी असलेला संबंध , ग्रामसंस्कृती त्याच प्रमाणे आर्थिक ,सामाजिक,धार्मिक इत्यादी गोष्टी कथेत येतात.

ग्रामीण कथेचा विचार करताना ग्रामीण कथाकारांनी ज्या काही वैशिष्टयपूर्ण कथा लिहिल्या आहेत त्यांचा परामर्थ घ्यावा लागतो.

कथेच्या बाबतीत अग्रक्रमी नांव घ्यावे लागते ते हरिभाऊ आपटे यांचे महाराष्ट्रामध्ये १८९७ साली मोठा दुष्काळ पउला. या दुष्काळामध्ये मानवी जीवनाची होणारी वाताहत पाहून त्यानी " काळ तर मोठा कठीण आला " ही कथा लिहिली.यामध्ये दुष्कळात अन्नास महाग झालेल्या एका शेतक-यांची कथा आली आहे आपले कुटूंब जगविण्यासाठी शहरात मजुरीसाठी आलेले शेतकरी आणि त्याच्या कुटूंबाची झालेली वाताहत लक्ष वेधून घेणारी आहे.

वि.स.सुखटनकरांचा " सहयाद्रीच्या पायथ्याशी "हा आठ प्रादेशिक कथांचा संग्रह १९३१ साली प्रसिध्द झाला.आजचे व कालचे गोमंतक असेही त्यांचे दर्शन त्यांच्या कथामध्ये आढळते. एक प्रकारचे प्रादेशिक रुप त्यांच्या कथाना लाभलेले दिसते. त्यांच्या या कथामध्ये ग्रामीण प्रादेशिक जीवनाची जाणीव चटकण लक्षण येते. लक्ष्मणराव सरदेसाई हे सुखटनकराचे समकालीन कथालेखक,त्यांनीही गोमंतकीय प्रादेशिक जीवन आपल्या कथांमधून मांडले आहे." कल्पवृक्षाच्या छायेत," सागराच्या लाटा ", "वादळातील नौका " , सोनेरी अंत " " निवारा " ,पडसाद हे त्यंचे कथासंग्रह वैशिष्टयपूर्ण आहेत. वाड.मयीन गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून पाहिले असता सुखटनकरांच्या कथेपेक्षा सरदेसाईची कथा सरस वाटते. सुखटनकरांपासून सुरु झालेला ग्रामीण प्रादेशिक वाड.मयाचा प्रवाह सरदेसाईच्या कथेने गतीशील ठेवला. त्यांच्या नंतर र.वा. दिघे आणि ग.ल. ठोकळ यांनी विपूल प्रमाणात कथालेखन केले. ग्रामीण जीवन व ग्रामीण अनुभव यांच्या पाठीशीहोते. ग्रामीण मीठ-भाकर ,शेती माती,हाडवैर इत्यादी गोष्टी त्यांनी मराठी कथेत आणल्या. त्याच प्रमाणे ग्रामीण जीवनाचे विविधरंग आणि ढंग,रंगेलपणा इत्यादी गोष्टी त्यांनी मराठी साहित्यात आणल्या.

"उपेखितांचे अंतरंग " हा श्री.म.माटे यांचा कथासंग्रह १९४१ साली प्रकाशित झाला. त्यानंतर "माणुसकीचा गहिवर " आणि भावनांची मांडणी" ह`कथा संग्रह प्रसिध्द णाले. दलित,अपेक्षित समाजातील विदारक चित्रण त्यांनी आपल्या कथामधून मांडले. खालच्या स्तरातील वयथा- वेदनांनी जगणारा माणूस, त्यांचे बदलेले मन त्यांनी ग्रामीण साहित्यात उभे केले. यांच्या कथा बद्दल अंजली सोमण म्हणतात." ग्राम जीवनातील दुःखाकडे ते सहानुभूतीने बघत लिहित नाहीत तर आतून त्या दुःखाची समरस होत लिहितात. त्यांच्या कथेतील कलात्मकतेचे हेच प्रमुख कारण आहे." वामन घोरपडे यांनी काही ग्रामीण कथा लिहिल्या त्यांनी " गोरी बायको " , "भाकरी ", अतिथि देवो भव " इत्यादी कथा लिहिल्या त्यांची कथा नवकथेशी नाते जोडणारी आहे.

म.वा.भोसले यांचे "अहेच लेणं " गार सावली " पाहुणेर, " पाझर " नांदायजाते" हे कथा संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांचे जीवन ग्रामीण परिसरात गेल्यामुळे त्यांनी ग्रामीण जीवन मनापासून रंगवले आहे.पण ते सरळ सुबोध वाटते. जीवनाची अर्थपूर्ण सखोलता कधीच भिडलेली दिसत नाही.

व्यंकटेश माडगूळकर यांचे " अहेव लेणं " , " गार सावली "," पाहुणेर ", " पाझर " नांदाय जाते हेकथा संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांचे जीवन ग्रामीण परिसरात गेल्यामुळे त्यांनी ग्रामीण जीवन मनापासून रंगवले आहे. पण ते सरळ सुबोध वाटते. जीवनाची अर्थपूर्ण सखोलता कधीच भिडलेली दिसत नाही.

व्यंकटेश माडगळकर यांचे "माणदेशी माणसं" "बारी" गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस " " उंबरठा " काळी आई " इत्यादी ग्रामीण कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांनी नवकथेला अर्थपूर्ण साजचढवला. सर्व माणदेश त्यांनी आपल्या कथेत उभा केला. माणदेशी दुष्काळ, दैन्यावस्था व गावाबाहेरची,माळावरती,फिरती,निरनिराळया जाती -जमातीची,निरनिराळया स्वभाव वैशिष्टयांची माणसे त्यांनी माणदेशी बोलीतून अविष्कृत केली आहेत. त्यांच्या कथा प्रामुख्याने व्यक्तीप्रधान आहेत. माडगूळकरांची कथा व्यक्ती,प्रदेश,प्रसंग, निसर्ग,प्राणी आणि पक्षी यांना जीवंत रुपात उभा करताना दिसते.

शंकर पाटील हे आघाडीचे ग्रामीण कथाकार आहेत. त्यांचे वळीव,आभाळ, उन, भेटीगाठी,धिंड ,वावरी शेंगा, खुळयांची चावडी, पाहुणी, फक्कड गोष्टी, " खेळखंडोबा," गारवेल, खटयाळकी, इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द झाले. मानवीमन व निसर्ग यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या कितोदिसतो, स्त्री चित्रे, पुरुषचित्रे,कौटूंबिक भावचित्रे, त्यांचे नाते संबंधी म्हणजे पाटलांच्या कथाचा आत्मा आहे. स्त्रीचा त्याग, माया,वात्सल्य, शोशिकपणा,पापभिरुता, भावडेपणा, हळवेपणा ही स्त्रीयांची गुणवैशिष्टये कथेत रेखाटली आहेत. मराठी ग्रामीण कथेत स्त्रीचे अंतरंग कथेत प्रथमच प्रकट झालेले आहे. मनवी स्वभावाची मासिक जाण, प्रसांचे निसर्गाचे सहज स्वाभाविक शेतीतील चित्रण,ग्रामीण बोलीचा परिणामकारक वापर, जीवनविषक चिंतन, त्यातील विंसंगती, खोल मातीत मुळ रुतवून आभाळच बनलेला प्रभावी निसर्ग, घटना - प्रसंगातील नाटयात्मक व सहजता या सा-यांचा कलाबूत वीण म्हणजे शंकर पाटलांची कथा, ५ थोडक्यात शंकर पाटलांची ग्रामीण कथेला वाङ्मयीनदृष्टया आधिक समृध्द केले.

द.मा.मिरासदार हे शंकर पाटलांचे समकालीन कथाकार आहेत. शुध्द, ग्रामीण, विनोदी कथा यांनीच लिहिली. "माझ्या बापाची पेंढ " " माकडमेचा " चकाटया, हसणावळ,गुदगुल्या, गंमत गोष्टी,विरगुळा,चुटक्याच्यागोश्टी, सरमिसळ,इत्यादी गोष्टी त्यांनी अचूकपणे टिपल्या आहेत. त्यांच्या कथेतील व्यक्ती गुंड आहेत, बेरकी आहेत. रिकामटकडया आहेत. त्यांच्या कथेतून विविध प्रवृत्तीची माणसे भेटतात. विविध स्वरुपाचे प्रसंग येतात त्यांच्या विनोदी कथाचां विशेश म्हणजे त्यांची खास अशी निवेदन शैली आहे. त्याचे खास मिरासदारी तंत्र आहे. त्यामुळे त्यांची कथा " मिरासदारी कथा " यानावाने ओळखली जाते.

उध्दव शेळके व रणजीत देसाई हे ही आघाडीचे कथाकार आहेत. त्यांच्या कथा व्यक्ती आणि परिस्थिती यांच्या समन्वयातून निर्माण होते व वाचकांना एकदम जीवनाच्या तळाशी घेऊन जाते. त्यांच्या कथेतून येणारी वास्तवता व रेखीव चित्रणे वाचकांच्यामनाची चटकन पकड घेतात.

ग.दि. माडगुळकर यांच्या " बांधावरच्या बाभळी," "पंताची किन्हई", " नेग्या" लपलेला ओघ इत्यादी कथा लक्षणीय आहेत. त्यांच्या कथांनी विशेष भर घातली नसली तरी त्यांची दखल घेण्याइतपत वेगळेपण त्यांच्या कथेत आहे. शंकरराव खरात यांचे " धोंडया बेरड " "पंचनामा " हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. खरातांच्या कथेतील विषय आणि विविध प्रकारची माणसे, त्यांच्या वागण्या - बोलण्याच्या विविध त-हा बघितल्या तर असे लक्षात येते की, खरातांचे अनुभव क्षेत्र व्यापक आहे. देशी बाहेरील माणसांचे दु:ख दारिद्रय , व्यथा, वेदना, त्यांची जीवनपध्दती यांचे चित्रण त्यांनी आपल्या कथेतून आणले आहे.

"खुळंवाडी " हा आणाभाऊ साठे यांचा ग्रामीण कथासंग्रह होय. त्यांच्या कथात घटनाप्रधानता ही प्रामुख्याने आढळते. ग्रामीण जीवन, तिथल्या मातीचे रागरंग आणि तिथला रौद्र निसर्ग, त्यांच्या कथात एकरुप झालेला आहे. त्यांच्या कथात मराठी बोली अभिव्यक्त झालेली आहे. आण्णाभाऊ यांची पात्रे अन्यायाविरुध्द चिडून उठतात. ती वैयक्तिक पातळीवर आडदाडपणे मोडतोड करु पाहतात. खून,मारामा-या, गुन्हे करतात. "बरबादयाकंजारी ", " भानामती" , " फरारी " , "आबी ", "गू-हाळ", "रानवेल ", " कृष्णाकाटया कथा " इत्यादी कथा संग्रहात ग्रामीण मातीचा रंग आहे.

" कोकणी ग वस्ती" हा मधूमंगेश कर्णिक यांचा पहिला कथासंग्रह त्यांच्या कथा आपणाला कोकणच्या पार्श्वभूमीवर नेतात. तेथील जीवनदर्शन घडवतात. कोकणचा निसर्ग, शेतीमाती, दलितांचेअपेखीत जीवन पारंपारिक रीतीरिवाज इत्यादीचे वर्णन त्यांच्या कथातून येते.

रा.रं.बोराडे हे मराठवाडयातील ग्रामीण जीवन रेखाटणारे ग्रामीण कथाकार आहेत. मराठवाडयातीलमातीचा वास असणारी, अस्सल , ग्रामीण साहित्य निर्मिती त्यांनी केली. " पेरणी", "मळणी", " वाळवण", "नातीगोती ", "बुरुज ", "वानकळा", "हेलकावे " इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. ते स्वत: खेडयातून व शेतकरी कुटूंबातून आले आहेत. खेडयातील माणसे, त्यांच्या जीवनपध्दती , अज्ञान, दारिद्रय, कष्टमयी जीवन जगण्याची पध्दती इत्यादीचे चित्रण त्यांनी आपल्या कथातून रेखाटले आहे.

"मातीखालची माती " व उखडलेली झाडे " हे आनंद यादयांचे ग्रामीण कथासंग्रह लक्षणीय आहेत. गरीब शेतकरी, कष्ट करणारा, शेतात काम करणारा, शेतमजूर, बागायती शेती इत्यादी गोष्टी त्यांनी कथातून रेखाटल्या आहेत. शेळया, कोकरे, बैलावर शेतक-याचे असणारे प्रेम, काळया मातीवरील प्रेम ,पीकपाणी- सणवार, जत्रा, विहिर, मोट-नाडा,ऊन- वारा यांचे चित्रण त्यांच्या कथातून येते. यादवांनी ग्रामीण कथेला सुजाण सखोलता दिली. अनुभवांच्या अनुषंगाने ग्रामीण भाषा स्विकारली. त्यांच्या कथेत मनोविश्लेषण आहे. परंतु कथा केवळ मनोविश्लेषणात्मक होत नाही.

सखा कलाल आणि दत्ता भोसले यांनीही ग्रामीण कथाकार म्हणून आपल्या नावाचा ठसा उमटवलेला आहे. स्त्रियांच्या वाटयाला आलेले दु:ख, त्यांचया व्यथा वेदना त्यांनी आपल्या कथातून रेखाटल्या आहेत. ग्रामीण माणसांच्या व्यथा,श्रध्दा, तरुण

मनाचेतरल भाव, गावां-गवामधील गलिच्छ राजकारण त्यांच्या कथामधून प्रामुख्याने दिसून येते. लोकविलक्षण व्यक्ती आणि विपरीत प्रसंग,प्रौढांचे जग आणिबालजग यातील विसंगतीतून त्यांची कथा आकार घेते.

भास्कर चंदनशिव यांचे "मरणकळा ", " जांभळढव्ह", "अंगारमाती ", इत्यादी कथासंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांच्या कथातून अवतरणारा परिसर हा मराठवाडयातील बीड व उस्मानाबाद या जिल्हयाच्या सिमा रेषेवरचा आहे. "पीळ" "कारल्याचा वेल " या कथामधून भोळी बाबडी आगदिक माणसे आणि त्यांच्या व्यथा वेदना. या सर्वामधून सुटण्यासाठी त्यांची चालीरिती जीवघेणी धडपड हा चंदनशिव यांच्या लेखनीचा विषय आहे. त्यांनी माणसातला माणूस, त्यांचे उध्दवस्त रुप, त्यांच्यामनातील चोरकप्पे, त्यंचे खोलवरचे दुःख उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलाआहे. ग्रामीण भागातील राजकारण,समाजकारण, दांभिकता, लफडेबाजी, दलितव गरीब लोकांवर झालेला अन्याय, श्रीमंतीच्या दुधावर पोसलेले साप गावोगावी दिसतात.

प्रतिमा इंगोले यांची कथा वास्तववादी आहे. " भुजंग ", "सारव " या त्यांच्या कथा केवळ पुरषप्रधानतेवर भर न देता परिसिथतीने पिचलेल्या स्त्रियांचे दुःख अतिशय तनमतयतेने मांडतात. त्यांच्या कथा, व्यापक व सामाजिक घटकांकडे लक्ष पुरविणा-या आहेत. त्यांच्या कथेतील दुःख वाचकांशी बोलते. व-हाडी बोलीच्या ठसकेबाजपणामुळे त्यांच्याकथेला जीवंतपणा आलेला आहे.

याशिवाय सदानंद देशमुख,बाबाराव मुसळे,वासूदे मुलाटे, मोहन पाटील,आनंद पाटील, महादेव मोरे रंगनाथ बापू पाटील, चारुता सागर, इत्यादी अनेक ग्रामीण कथाकारानी आपल्या वैशिष्टयपूर्ण मांडणीचे, अनुभव विश्वाने मराठी कथेचे दालन समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे.

**समारोप :-**

अशा रितीने मराठी कथेचा प्रवाह पाहिला तरआशय,अभिव्यक्ती, भाषाविशेष कलात्मक गुणवत्ता अशा विविध अंगानी विकसित झालेला आहे. स्वातंत्र्यपूर्व कळातील ग्रामीण कथेचे अवलोकन केल्याससंपन्न व समर्थ ग्रामीण कथात दिसत नाहीत. कारण तात्कालीन कथालेखक नागर असल्याने, त्यांचे अनुभव विश्व शहरी असल्याने हा परिणाम झाला असावा. परंतु १९६० नंतरच्या ग्रामीण कथेत एक वेगळाच ठसा उमटविला,ग्रामीण कथेने दलित जीवनालाही आपला विषय मानले. दलित जीवनांच्या अस्पर्श बाजु व्यक्त केल्या.

आजची ग्रामीणकथा संख्यात्मक व गुणात्मकदृष्टया संपन्न झालेली आहे. कारण आजच्या ग्रामीण कथाकारांच्या सुक्ष्म अवलोकनामुळे ग्रामीण जाणिवा अविष्कृत झाला आहे.

**संदर्भ :-**

१) आनंद यादव,ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समिखा (प्रस्तावना ) मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे प्र.आ.१९७९ पृ.क्रं. ६
२) नागनाथ कोतापल्ले,ग्रामीण साहित्य , स्वरुप आणि शोध,मेहता पबिल्शिंग हाऊस पुणे प्र.आ. १९७९,पृ.क्रं. ६
३) श्रीराम गुंदेकर,ग्रामीण साहित्य:प्रेरणा आणि प्रयोजन दिलीपराव प्रकाशन प्रा.लि. प्र.आ. १९९९ पृ.कं. ३२.
४) अंजली सोमण : मराठी कथेची स्थितिगती,प्रतिमा प्रकाशन, पुणे,प्र.आ. १९९५ पृ.क्रं. १६१.
५) चंद्रकमार नलगे, ग्रामीण वाड.मयाचा इतिहास, सुरेश एजन्सी,पुणे प्रा.आ.१९९५ पृ.क्रं. १६६.